# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/05/2023 (शुक्रवार) दुपार

## जबरी चोरी

पो.स्टे. सावनेर :- अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. ५ बाजार चौक पाटनसावंगी येथे दिनांक २४/०५/२०२३ चे २१/४५ वा. सुमारास फिर्यादी नामे- किशोर वामनराव मरजिवे, वय ५८ वर्ष, रा. वॉर्ड नंबर ५, पाटणसावंगी ता. सावनेर जि. नागपुर हा दि. २४/०५/२०२३ रोजी रात्री ०९.४५ वा. चे सुमारास आपले किशोर वामनराव मरजिवे ज्वेलर्स सोने चांदीचे दुकान बंद करुन दुकानातील १) सोन्याची लगड २० ग्रॅम किंमती १,००,०००/- रुपये, २) सोन्याचे बनवलेले दागीने २० ग्रॅम किंमती अंदाजे १,०००,००/- रुपये, ३) सोन्याचे बनवलेले कानातले टॉप्स ३० ग्रॅम किंमती १,५०,०००/- रुपये, ४) सोन्याचे बनवलेले डोरले २० ग्रॅम किंमती १,००,०००/- रुपये, ५) सोन्याचे बनवलेले तार, बाळी, पिटीव मणी व दोड मणी अंदाजे ४० ग्रॅम २,००,०००/-रु, ६) सोन्याच्या बनवलेल्या लेडीज अंगठया २० ग्रॅम किंमती १०००००/-रुपये, ७) पत्नी संगिता हिचे बॅगमध्ये असलेल्या दागीन्याचे डब्यात सोन्याचा लक्ष्मीहार व मंगळसुत्र ५० ग्रॅम किंमती २,५०,०००/- रू. असा एकुण १८० ग्रॅम सोन्याचे बनवलेले दागीने व सोन्याची २० ग्रॅम लगड किंमती अंदाजे १०,०००,००/- लाख रुपये सदर मुद्देमाल एका थैलीमध्ये भरून मोटरसायकलवर जात असताना त्याचे दुकानासमोर तीन अनोळखी ईसमा पैकी एका ईसमाने फिर्यादीच्या गाडीवर ठेवलेली बॅग घेवुन गेला. फिर्यादीने त्याचा पाठलाग करीत असता दोन अनोळखी इसमांनी कोणत्यातरी हत्याराचा फटाक्यासारखा आवाज करुन भिती निर्माण करुन फिर्यादीचे सोन्याचे दागीने असलेली थैली चोरी करून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवी सह कलम ३/२५ शस्त्र अधिनीयम १९५९ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे पोस्टे सावनेर मो. क्र. ७६६६९७९८६५ हे करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. कळमेश्वर :- अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी शिवार येथे दिनांक २४/०५/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक २५/०५/२०२३ चे ०७.०७ वा. दरम्यान फिर्यादी नामे- हंसराज नारायण मांगे, वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ यांची मौजा गोंडखैरी शिवारात शेती असून त्याच्याकडे एक पांढऱ्या रंगाचा व एक लाल रंगाचा असे दोन बैल असून किंमती अंदाजे १००००/- रू. तसेच वासुदेव लोणारे यांचे लाल रंगाचे दोन बैल किंमती अंदाजे १००००/- असे एकुण २००००/- रू. चे ते नेहमी शेतात बांधत होते. यातील फिर्यादीने दि. २४/०५/२०२३ चे सकाळी ०७.०० वा. ते सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत शेतात बैलजोडीच्या साहयाने काम केले व नेहमी प्रमाणे सायंकाळी ०६/०० वा. बैलजोडी शेतात खुटाला बांधुन घरी निघुन गेले. नेहमी प्रमाणे फिर्यादी दुसऱ्या दिवशी दि. २५/०५/२०२३ चे ०७.०० वा. शेतात गेले असता बैलजोडी कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/अतुल शेंडे ब. नं. १८१३ पो.स्टे. कळमेश्वर मो. नं. ८२०८१०१७८५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत गुमथळा कामठी येथे २४/०५/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक २५/०५/२०२३ चे ०६.०० पर्यंत फिर्यादी नामे— दिलीप आनंदराव उपरीकर, वय ४५ वर्षे रा. नरवा ता. लाखनी जि. भंडारा ह. मु. गुमथळा कामठी यांचे घरासमोरील गोठयातुन कोणीतरी अज्ञात चोराने १) ३ वर्षाची काळया रंगाची गावरानी गोरी किंमती अंदाजे २०,०००/—रू २) ६ महिन्याची साहीवल जातीची लाल रंगाची गोरी किंमती अंदाजे १५,०००/—रू ३) तीन महिन्याचा लाल रंगाचा गोरा किंमती अंदाजे १५,०००/—रू असा एकुण ५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम ब. नं १६९ मो. क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १३ किमी अंतरावर थातुरवाडा येथे दिनांक २३/०५/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक २४/०५/२०२३ चे ०५.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— अनिल शंकरराव शेळके, वय ६६ वर्ष, रा. थातुरवाडा हे दि. २०/०१/२०२३ रोजी सकाळी पहाटे ०५.०० वा. दरम्यान झोपेतुन उठले व घराचे चारही बाजुला पाहत असता घराचे कंपाउंडचे आत अंगणामध्ये उत्तर कोपऱ्यात उघडयावर ठेवलेले शेतातील चन्याच्या ०८ बोऱ्या अंदाजे ०५ क्विंटल एकुण किंमती अंदाजे १६०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ३९८ भुशन मदनकर पो.स्टे. काटोल मो. नं. ८२७५३९६४०३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**